# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/05/2023 (मंगळवार) दुपार

---

## पाण्याची मोटार चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा मनसर येथे दिनांक २१/०५/२०२३ चे ०९.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान ग्रामपंचायत मनसर येथिल स्टोअर रूम मध्ये ठेवलेली पाण्याचे आत मध्ये असणारी किर्लोस्कर कंपनीची ७ एच. पी. ची पाण्याची मोटार किंमती अंदाजे २०,०००/— रूपयाची मोटार कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— योगेश राजगिरी गोस्वामी, वय ३५ वर्ष, रा. शिक्षक कॉलनी मनसर ता. रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र अडामे ब. नं. १२८७ पो.स्टे. रामटेक मो. नं. ९६३७४००८७३ हे करीत आहे.

## बॅटरी चोरी

पो.स्टे. वेलतूर :— अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील मौजा वेलतूर येथे दिनांक २१/०५/२०२३ ते दिनांक २२/०५/२०२३ चे २३/०० वा. ते ०७/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शंकर हरीचंद बांगळकर, वय ५६ वर्ष रा. वेलतूर हे शेती करत असून शेतमालाची ने आण करणेकामी एक स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर MH-40-BE-6067 असून तो ट्रॅक्टर ते शेतीचे काम झाल्यानंतर घरासमोर उभा ठेवतात फिर्यादी यांनी आपला ट्रॅक्टर घरापुढे उभा ठेवला व सकाळी शेतावर जायचे असल्याने ते ट्रॅक्टर सूरू करायला गेले असता तो सूरू न झाल्याने त्यांनी खाली उतरून ट्रॅक्टर चेक केले असता त्यांच्या ट्रॅक्टरची लीवगार्ठ कंपनीची मॉडेल नं 90TRL YCAJRB58994BW 4,000/.रू. ची बॅटरी दिसून आली नाही तेव्हा त्यांनी याबाबत गावामध्ये चौकशी केली असता त्याच रात्री त्यांच्याच गावातील तूलाराम विठ्ठल घूघूसकार यांचे स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर MH-40-BE-5079 ची ॲमेरॉन कंपनीची 90 TRL बॅटरी किंमती अंदाजे ४,०००/—रू. व रजन विजय जिभकाटे याची महेंन्द्रा कंपनीच्या ट्रॅक्टरची MH-40-BE-2660 ची BOSS कंपनीची 90TRL बॅटरी किंमती अंदाजे ४,०००/— रू. ची बॅटरी अशा एकूण १२,०००/—रू. किंमतीच्या तीन बॅटऱ्या एकाच वेळी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ/संजय पायक ब. नं २१० पो.स्टे वेलतूर मो. नं ८८३०९२३३१० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर